# फ्लिपकार्टतर्फे पश्चिम बंगालमधील हरीनघाटा येथे भारतातील सर्वात मोठ्या आधुनिक फुलफिलमेंट सेंटरची स्थापना;

## लक्षावधी विक्रेते आणि कारागीरांसाठी नव्या रोजगाराच्या संधी आणि बाजारपेठांमध्ये प्रवेशाच्या संधीची निर्मिती

- *या भागात ११,००० थेट आणि हजारो अप्रत्यक्ष रोजगारांची निर्मिती करणार*
- *पश्चिम बंगाल राज्य आणि ईशान्य भारतातील सुमारे २०,००० विक्रेते आणि एमएसएमईंच्या वाढत्या जाळ्याला पाठबळ पुरवून ग्राहकांच्या गरजा सुविहित पद्धतीने वेगाने पुरवणार*
- *६ पोटमाळ्यांवर विस्तारलेल्या ५० लाख घनफूट साठवणूक क्षमतेसह हरीनघाटा फुलफिलमेंट सेंटरमध्ये २० लाख चौरस फुटांचा एकूण बिल्ट अप एरिया असेल*
- *हरीनघाटा फॅसिलिटी ही आयजीबीसीतर्फे प्लॅटिनम रेटिंगचे हंगामी प्रमाणपत्र मिळवणारी भारतातील पहिली ई-कॉमर्स फॅसिलिटी असून त्यातून फ्लिपकार्टची पर्यावरणविषयक जागरूकता दिसून येते, त्याचबरोबर या फॅसिलिटीमध्ये ऑटोमेटेड स्टोअरेज, रिट्रीव्हल, रोबोटिक पॅकेजिंग आर्म आणि क्रॉस बेल्ट सॉर्टर्स यांच्यासारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानांचा वापर करण्यात आलेला आहे.*

**कोलकाता – २१ एप्रिल २०२२ :** फ्लिपकार्ट या भारतातील एतद्देशीय ई-कॉमर्स बाजारपेठेने आज पश्चिम बंगालमधील हरीनघाटा येथे भारतातील सर्वात मोठ्या फुलफिलमेंट सेंटरचे उद्घाटन झाल्याची घोषणा करून पूर्व भारतातील लक्षावधी विक्रेते, कारागीर आणि रोजगारक्षम युवकांसाठी मोठ्या प्रमाणावर उद्योजकता आणि रोजगाराची संधी निर्माण करून देण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल उचलले आहे. पश्चिम बंगाल आणि ईशान्य भारतातील जवळपास २०,००० विक्रेत्यांना पाठबळ देऊन ११,००० रोजगार संधी निर्माण करणाऱ्या या तंत्रसमृद्ध फॅसिलिटीचे उद्घाटन माननीय मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या हस्ते बंगाल ग्लोबल बिझनेस समिटमध्ये (बीजीबीएस) मुख्यमंत्र्याचे मुख्य सल्लागार अमित मिश्रा, उद्योग मंत्री पार्था चॅटर्जी, परिवहन आणि गृहनिर्माण मंत्री फिरहाद हकिम आणि मुख्य सचिव एच. के. द्विवेदी यांच्या उपस्थितीत (व्हर्च्युअल पद्धतीने) करण्यात आले.

कोलकात्यापासून ५० किलोमीटर अंतरावरील या बिग बॉक्स फॅसिलिटीमध्ये ११० एकरांवर पसरलेले एकात्मिक पुरवठा साखळी व्यवस्थापन आहे. पश्चिम बंगाल आणि ईशान्य भारताच्या प्रदेशाला राष्ट्रीय बाजारपेठेशी जोडण्यासाठी आवश्यक अधिक भक्कम पुरवठा साखळीच्या मूलभूत यंत्रणा पुरवून ही फॅसिलिटी स्थानिक अर्थव्यवस्थेला बळकटी देईल आणि ग्राहकांच्या वाढत्या मागणीलाही प्रतिसाद देईल.

६ पोटमाळ्यांवर विस्तारलेल्या ५० लाख घनफूट साठवणूक क्षमतेसह हरीनघाटा फुलफिलमेंट सेंटरमध्ये २० लाख चौरस फुटांचा एकूण बिल्ट अप एरिया असेल. या फॅसिलिटीमध्ये ऑटोमेटेड स्टोअरेज, रिट्रीव्हल, रोबोटिक पॅकेजिंग आर्म आणि क्रॉस बेल्ट सॉर्टर्स यांच्यासारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानांचा वापर करण्यात आला असून ९ किलोमीटर लांबीचा नेटवर्क कन्व्हेयर बेल्ट शिपमेंट मूव्हमेंटमधील टर्नअराऊंड टाइम ३५-४० टक्क्यांनी कमी करतो. सिस्टम ड्रिव्हन टास्क डिस्ट्रिब्युशन, साठवणूक, प्रक्रिया आणि वाटप यांचे ऑटोमेशन यांच्या माध्यमातून ग्राहक आणि विक्रेते यांच्या परिसंस्थेसाठी मौलिक यंत्रणा उभी करणारी ही फॅसिलिटी आहे.

फ्लिपकार्टच्या पर्यावरणस्नेही पुरवठा साखळी उभारण्याच्या वचनबद्धतेचा गौरव म्हणून हरीनघाटा फॅसिलिटी ही इंडियन ग्रीन बिल्डिंग कौन्सिलतर्फे हंगामी प्लॅटिनम रेटिंग मिळवणारी भारतातील पहिली ई-कॉमर्स फॅसिलिटी बनली आहे. आयजीबीसीच्या आयजीबीसी ग्रीन लॉजिस्टिक्स पार्क्स अँड वेअरहाऊसेस रेटिंग सिस्टमच्या नव्या वेअरहाऊस श्रेणीमध्ये हे प्रमाणपत्र देण्यात आले आहे. देशातील लॉजिस्टिक्स पार्क्स, वेअरहाऊसेस आणि अन्य स्टोअरेज फॅसिलिटींची पर्यावरणस्नेहक्षमता तपासण्यासाठी ही अशा प्रकारची पहिलीच आणि विशेष रेटिंग सिस्टम विकसित करण्यात आली आहे. कार्बन उत्सर्जनात घट, ऊर्जा व पाण्याची वाढीव बचत, पर्जन्यजल साठवण, संसाधनांचे व्यवस्थापन, जैविक विविधतेचे संरक्षण, लीड टाइमचे अनुकूलन, साठवणीच्या जागेचा जास्तीत जास्त वापर, कर्मचाऱ्यांच्या आरोग्य आणि जीवनमानाची अधिक उत्तम व्यवस्था आणि कर्मचारीबळाची सर्वोच्च उत्पादनक्षमता यांसारख्या शाश्वततेशी संबंधित अनेक पैलूंचे एकात्मिकरण या सिस्टममध्ये करण्यात आले आहे.

**पश्चिम बंगालच्या माननीय मुख्यमंत्री ममता बॅनर्जी** म्हणाल्या, “फ्लिपकाटच्या हरीनघाटा येथील अत्याधुनिक, भविष्यवेधी फुलफिलमेंट सेंटरच्या उभारणीच्या रूपाने भारतातील ई-कॉमर्स लॉजिस्टिक्स इंडस्ट्रीने मोठी झेप घेतली असून देशातील सर्वात मोठया फुलफिलमेंट सेंटर्सपैकी एक पश्चिम बंगालमध्ये आहे, ही आमच्यासाठी अतीव अभिमानाची गोष्ट आहे. या प्रदेशाच्या आणि येथील नागरिकांच्या आर्थिक विकासात मोठा वाटा उचलेल आणि देशात शाश्वत व तंत्रज्ञानचलित वेअरहाऊसिंग सुविधा विकसित करण्याच्या दृष्टीने नवा मानदंड प्रस्थापित करेल, अशी यशस्वी कामगिरी केल्याबद्दल मी फ्लिपकार्टच्या सगळ्या टीमचे अभिनंदन करते. एक प्रगतिशील राज्य म्हणून पश्चिम बंगाल हे कंपन्यांनी नव्याने गुंतवणूक करण्यासाठी सुयोग्य वातावरण निर्माण करण्यात अग्रेसर राज्य असून आम्ही त्यांची कल्पना वास्तवात आणण्यासाठी त्यांच्यासोबत खांद्याला खांदा लावून काम करत आहोत.”

**फ्लिपकार्ट ग्रूपचे चीफ एक्झिक्युटिव्ह ऑफिसर कल्याण कृष्णमूर्ती** म्हणाले, “ई-कॉमर्समध्ये प्रत्येक भारतीयाला जोडण्याची, विक्रेते, ग्राहक, कारागीर, किराणा दुकाने आणि शेतकरी यांच्या परिसंस्थेसाठी मौलिक बळ देण्याची क्षमता आहे. लाखो छोटे आणि मोठे व्यवसाय जोडण्यासाठी एक भक्कम पुरवठा साखळी सर्वात महत्त्वाची असते आणि देशांतर्गत विकसित झालेली ई-कॉमर्स बाजारपेठ असल्याने आम्ही या देशाच्या आर्थिक विकासासाठी आवश्यक अशी ही संधी साधण्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा, तंत्रज्ञान आणि गुणवत्ता यांच्यात गुंतवणूक करण्यासाठी वचनबद्ध आहोत. हरीनघाटा फुलफिलमेंट सेंटरच्या उभारणीमुळे पुरवठा साखळीच्या पायाभूत यंत्रणांना बळ मिळेल आणि देशात तंत्रज्ञानचलित आधुनिक वेअरहाऊसिंग यंत्रणा उभी करण्याच्या क्षेत्रात हा एक मैलाचा दगड ठरेल. आमच्या कामकाजाची ताकद आम्ही या ग्रहाच्या आणि आमच्या माणसांच्या भल्यासाठी वापरणारी ही आमच्या सर्वात पर्यावरणस्नेही फॅसिलिटीजपैकी एक फॅसिलिटी आहे, याचा आम्हाला अभिमान आहे.

**पश्चिम बंगालचे माननीय उद्योग, वाणिज्य आणि उपक्रम मंत्री पार्था चॅटर्जी** म्हणाले, “या भागात आर्थिक विकास व्हावा यासाठी अधिक गुंतवणूक आकर्षित करणारे वातावरण निर्माण करण्यास पश्चिम बंगाल बांधिल आहे. पुरवठा साखळी, मनुष्यबळ आणि तंत्रज्ञानात गुंतवणूक करून आर्थिक विकासाला चालना देण्यात फ्लिपकार्टने दीर्घकाळ सहकार्य केले आहे, हे सांगताना मला आनंद होतो. देशातील सर्वात भव्य फुलफिलमेंट सेंटरमध्ये गणले जाणारे अत्याधुनिक आणि भविष्याचा वेध घेणारे फ्लिपकार्टचे फुलफिलमेंट सेंटर हरिनघाटा येथे सुरू होणे ही आपल्यासाठी अभिमानाची बाब आहे आणि आपल्या गुंतवणूकस्नेही धोरणांचे ते प्रतिकही आहे.”

या फॅसिलिटीचे बांधकाम २०१९ साली सुरू झाले होते. तिला पूर्ण होण्यासाठी दोन वर्षे लागली. तंत्रज्ञान आणि पर्यावरणस्नेही रचना यांची सांगड घालत हे बांधकाम ऑक्टोबर २०२१मध्ये पूर्ण झाले.

**About the Flipkart Group**

The Flipkart Group is one of India's leading digital commerce entities and includes group companies Flipkart, Myntra, Flipkart Wholesale, Flipkart Health+ and Cleartrip. The Group is also a majority shareholder in PhonePe, one of the leading Payments Apps in India.

Started in 2007, Flipkart has enabled millions of consumers, sellers, merchants, and small businesses to be a part of India's digital commerce revolution, with a registered customer base of more than 400 million, offering over 150 million products across 80+ categories. Our efforts to democratize commerce in India, drive access and affordability, delight customers, create lakhs of jobs in the ecosystem, and empower generations of entrepreneurs and MSMEs have inspired us to innovate on many industry firsts. Flipkart is known for pioneering services such as Cash on Delivery, No Cost EMI and easy returns – customer-centric innovations have made online shopping more accessible and affordable for millions of Indians. Together with its group companies, Flipkart is committed to transforming commerce in India through technology.

**For more information, please contact media@flipkart.com**